03-07-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 7/2/2025 10:16 PM Page 1



# विराट- रोहितमुळे सिडनी वनडे सामन्याची ४ महिन्यांपूर्वीच संपली सर्व तिकिट

**कॅनबेरा, दि. २ :**

सध्या भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडमध्ये कसोटी मालिका खेळत आहे. त्यानंतर ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये भारत ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार आहेत. त्यात ते तीन वनडे आणि पाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळणार आहेत.या सामन्यात विराट कोहली आणि रोहित शर्मा दोघेही एकत्र खेळताना दिसणार आहे अशी माहिती ऑस्ट्रेलिया क्रिकेटने दिली आहे. या चार महिन्यांनंतर होणाऱ्या भारत-ऑस्ट्रेलिया मालिकेतील सिडनी वनडेसाठी सर्व तिकिटे आधीच विकली गेली आहेत.

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने आपल्या निवेदनात म्हटले, सिडनी क्रिकेट ग्राऊंड (एससीजी) येथील वनडे आणि मनुका ओव्हल (कॅनबरा) येथील टी-२० सामन्यांची तिकिटे सामन्यांना चार महिने बाकी असतानाच संपली आहेत, जे या सामन्यांच्या प्रचंड मागणीचे द्योतक आहे. तसेच, एमसीजी टी-२० आणि गाबा टी-२० सामनेही खूप लोकप्रिय होत आहेत. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने पुढे सांगितले की, अॅशेस सामन्यांसाठी विक्रमी तिकिट विक्री झाल्यानंतर, आता व्हाइट-बॉल सामन्यांनाही प्रचंड मागणी आहे. तिकिट विक्री सुरू झाल्याच्या अवघ्या दोन आठवड्यांत आठ सामन्यांसाठी ९०,००० हून अधिक तिकिटं विकली गेली आहेत.



त्यांनी पुढे सांगितले की, आतापर्यंत विकल्या गेलेल्या तिकिटांपैकी १६ टक्क्यांहून अधिक तिकिटं भारतीय चाहत्यांच्या क्लबांनी खरेदी केली आहेत. भारत आर्मी हा सर्वात सक्रिय चाहता क्लबांपैकी एक आहे, ज्याने २,४०० हून अधिक तिकिटं खरेदी केली आहेत. फॅन्स इंडिया या क्लबनेही जबरदस्त उत्साह दाखवत १,४०० हून अधिक तिकिटं खरेदी केली आहेत. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने या मालिकेचे वातावरण आणखी खास केले. त्यांनी एका निवेदनात म्हटले की, हा ऑस्ट्रेलिया दौरा विराट कोहली आणि रोहित शर्माचा शेवटचा दौरा असू शकतो. त्यामुळे या दोन्ही खेळाडूंना सन्मानित करण्यासाठी ही मालिका खास बनवण्याचा प्रयत्न केला जाईल. इंग्लंडविरुद्ध सुरु असलेल्या कसोटी मालिकेतील शेवटचा सामना ८ नोव्हेंबरला ब्रिस्बेन येथे होईल. वनडे मालिकेत विराट आणि रोहित खेळताना दिसतील, कारण दोघांनीही कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. २०२१७ च्या वनडे विश्वचषकाच्या दृष्टीने ही मालिका दोघांसाठीही महत्त्वाची आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने सांगितले की, ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या भारत-ऑस्ट्रेलिया वनडे मालिकेसाठी भारतीय चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे.

# 'पोलीस हे काही देव अथवा जादूगार नाहीत', बंगळुरू चेंगराचेंगरीसाठी 'आरसीबी' जबाबदार

**बंगळुरू, दि. २ :**

केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकारणे ४ जूनला बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये झालेल्या चेंगराचेंगरीसाठी 'आरसीबी' (रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू)ला जबाबदार ठरवले आहे. संघाने पोलिसांच्या परवानगीशिवाय सोशल मीडियावर अचानक विजयी परेडची घोषणा केली. यामुळे लाखोंच्या संख्येने गर्दी जमा झाली. या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला होता.

न्यायधिकारणाने आपल्या विधानात म्हटले की, प्राथमिकदृष्ट्या हे समोर दिसत आहे की साधारण तीन ते पाच लाख लोकांची गर्दी एकत्र जमा करण्यासाठी आरसीबी जबाबदार आहे. आरसीबीने पोलिसांकडून याबाबतची कोणतीही परवानगी घेतली नाही. अचानक सोशल मीडियावर पोस्ट आली आणि त्यामुळेच इतक्या मोठ्या संख्येने लोक जमा झाले.



न्यायधिकरणाने आरसीबीकडून अचानक करण्यात आलेल्या या कार्यक्रमाची घोषणा ही अव्यवस्था पसरवणारे असल्याचे म्हटले आहे. आदेशात म्हटले की आरसीबीने कोणत्याही पूर्व परवानगीशिवाय अचानक या प्रकारची अव्यवस्था उत्पन्न केली. त्यामुळे केवळ १२ तासांत पोलीस सर्व आवश्यक व्यवस्था पोलीस अधिनियम अंतर्गत करेल अशी आशा कशी करू शकतो.

आरसीबीने आपल्या पहिल्या आयपीएल विजयाच्या दुसऱ्या दिवशी ४ जूनला एका विजयी परेडची घोषणा सोशल मीडियावर केली होती. न्यायाधिकरणने पोलिसांच्या या भूमिकेचा बचाव करताना म्हटले, पोलीस कर्मचारीही माणूस आहेत. ते देव नाहीत आणि जादूगारही नाहीत. त्यांच्याकडे अल्लादीनचा चिराग सारखे जादूचे यंत्र नाही जे बोट फिरवल्यावर कोणाचीही इच्छा पूर्ण करू शकतील.

न्यायाधिकरणनेही हे ही स्पष्ट केले की पोलिसांना पुरेशा तयारीसाठी योग्य तो वेळ दिला गेला नाही. ४ जून २०२५ला वेळेच्या कमतरतेमुळे पोलीस आवश्यक की व्यवस्था करू शकले नाहीत. पोलिसांना पुरेसा वेळ मिळाला नाही.

# 'कॅप्टन कूल' ट्रेडमार्कसाठी धोनीचा अर्ज मंजुरीच्या मार्गावर

**नवी दिल्ली, दि. २ :**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी आता कॅप्टन कूल या लोकप्रिय वाक्यांशावर कायदेशीर मालकी मिळवण्याच्या तयारीत आहे. त्यासाठी त्याने कॅप्टन कूल' हा शब्द ट्रेडमार्क म्हणून नोंदविण्याचा अर्ज दाखल केला असून, तो सध्या अंतिम मंजुरीपूर्वीच्या टप्प्यात आहे.

ट्रेड मार्क्स रजिस्ट्री पोर्टलच्या माहितीनुसार, धोनीच्या अर्जाची स्थिती ४१ व्या वर्गात स्वीकारली गेली आणि जाहिरात केली गेली' असल्याचे नमूद करण्यात आले आहे. हा वर्ग शिक्षण, प्रशिक्षण, मनोरंजन, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांशी' संबंधित आहे.

धोनीने ५ जून २०२३ रोजी ट्रेडमार्क नोंदणीचा अर्ज दाखल केला होता. त्याची १६ जून २०२५ रोजी अधिकृत जर्नलमध्ये घोषणा झाली आहे. नियमांनुसार, या टप्प्यानंतर १२० दिवसांची वाट पाहावी लागते या कालावधीत कोणी तृतीय पक्ष आक्षेप घेतल्यास सुनावणी होईल, अन्यथा हा ट्रेडमार्क धोनीला मंजूर होईल.



धोनीच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत त्याने मैदानावरील शांत स्वभाव, रणनीतीतील प्रगल्भता आणि अत्यंत दडपणाखालीही संयम राखण्याची क्षमता यामुळे 'कॅप्टन कूल' ही उपाधी मिळवली होती. हीच ओळख आता ब्रँडमध्ये रूपांतरित करण्याच्या दिशेने तो पाऊल टाकत आहे.

मात्र, या वाक्यांशावर धोनी एकटाच दावा करत नाही. प्रभा स्किल स्पोर्ट्स प्रा. लि.या संस्थेनेही याच वाक्यांशासाठी यापूर्वी अर्ज केला होता. पण सध्या त्या अर्जाची स्थिती 'दुरुस्ती दाखल' अशी आहे.

धोनी सध्या आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्ज संघाचा भाग आहे. यंदाच्या मोसमात संघाला विशेष यश मिळालं नाही. कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या अनुपस्थितीत धोनीने हंगामाच्या मध्यभागी पुन्हा नेतृत्वाची धुरा घेतली.त्याच्या पुनरागमनाबाबत अजून औपचारिक घोषणा झाली नसली, तरी तो संभावनांची दारे उघडी ठेवत आहे.

जून महिन्यात आयसीसीने धोनीला २०२५ साठी क्रिकेट हॉल ऑफ फेममध्ये समाविष्ट केल्याची घोषणा केली. ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू हेडन आणि दक्षिण आफ्रिकेचा हाशिम अमला यांच्यासह धोनीची निवड झाली. दबावाखाली शांत राहण्याची विलक्षण क्षमता, रणनीतीतील कौशल्य आणि छोट्या फॉरमॅटमध्ये नेतृत्व करण्याची शैली यामुळे धोनीचा हॉल ऑफ फेममध्ये सन्मान करण्यात आला आहे, असे आयसीसीने निवेदनात म्हटले.

# क्रिकेटपटू सूर्यकुमार यादव रुग्णालयात

**नवी दिल्ली, दि. २ :**

भारताच्या टी २० क्रिकेट संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव जर्मनीतील रुग्णालयात आहे. सूर्यकुमार यादववर जर्मनीत यशस्वी स्पोर्ट्स हर्निया झाली.

बीसीसीआयने रोहित शर्मानंतर भारताच्या टी २० क्रिकेट संघाचे नेतृत्व ३४ वर्षांच्या सूर्यकुमार यादवकडे सोपवले. पण शस्त्रक्रियेमुळे सूर्यकुमार यादव बांगलादेश दौऱ्यावर जाण्याची शक्यता कमी आहे. पूर्ण बरा होण्यासाठी सूर्यकुमारला किमान सहा ते बारा आठवडे लागतील.

पुढच्या वर्षी म्हणजेच २०२६ मध्ये भारत आणि श्रीलंका संयुक्तपणे टी २० विश्वचषक स्पर्धेचे आयोजन करणार आहेत. या स्पर्धेत सूर्यकुमार यादव भारताच्या टी २० क्रिकेट संघाचे नेतृत्व करेल. सध्या भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. यानंतर भारत बांगलादेश दौऱ्यावर जाणार आहे. बांगलादेशमध्ये एकदिवसीय सामन्यांची मालिका आणि टी २० मालिका खेळवली जाणार आहे. पहिला टी २० सामना २६ ऑगस्ट २०२५ रोजी तर शेवटचा टी २० सामना ३१ ऑगस्ट २०२५ रोजी होणार आहे.

सूर्यकुमार यादवची सोशल मीडिया पोस्ट



'लाइफ अपडेट, पोटाच्या खालच्या उजव्या भागात स्पोर्ट्स हर्नियाची शस्त्रक्रिया झाली. यशस्वी शस्त्रक्रियेनंतर, मी बरा होत आहे. क्रिकेटच्या मैदानावर परतण्याची उत्सुकतेने वाट पाहत आहे.'

सूर्यकुमार यादवची कारकिर्द

सूर्यकुमार यादवने तिसाव्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने एक कसोटी, ३७ एकदिवसीय आणि ८३ टी २० सामने खेळले आहेत. त्याने एकदिवसीय सामन्यात ७७३ धावा आणि टी २० मध्ये २५९८ धावा केल्या आहेत. त्याने एकदिवसीय सामन्यात चार अर्धशतके झळकावली आहेत. तसेच त्याने टी २० मध्ये चार शतके आणि २१ अर्धशतके झळकावली आहेत. तो रुग्णालयात दाखल होण्याआधी मुंबई लीग २० या काही दिवसांपूर्वी झालेल्या स्पर्धेत खेळला होता.

# अभिनेता सलमान खान बनला दिल्ली फ्रँचायझीचा मालक

**नवी दिल्ली, दि. २:**

देशातील पहिली आणि सर्वात मोठी टेनिस बॉल टी-१० क्रिकेट लीग इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीगच्या तिसऱ्या हंगामापूर्वी एक मोठी घोषणा करण्यात आली आहे. बॉलिवूड सुपरस्टार सलमान खान आता आयएसपीएल मधील नवी दिल्ली फ्रेंचायझीचे मालक असणार आहेत. ही नवी टीम आयएसपीएल मध्ये अशा वेळी सामील झाली आहे, जेव्हा या लीगने आपल्या दुसऱ्या हंगामात प्रचंड लोकप्रियता मिळवली आहे. आयएसपीएल हंगाम २ ने टीव्हीवर २.८ कोटींहून अधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचले आणि पहिल्या सीझनच्या तुलनेत ४७ टक्के वाढ झाली. यामुळे आयएसपीएल मधील रोमांच वाढला आहे.

सलमान खानच्या सामील होण्यामुळे केवळ नवी दिल्ली संघच बळकट होणार नाही, तर संपूर्ण लीगला एक नवीन ओळख मिळणार आहे. आता तो अशा सेलिब्रिटींच्या यादीत सामील झाला आहे, ज्यांच्याकडे आधीच इतर आयएसपीएल संघ आहेत. यामध्ये अमिताभ बच्चन (माझी मुंबई), सैफ अली खान आणि करीना कपूर खान (टायगर्स ऑफ कोलकाता), अक्षय कुमार (श्रीनगर के वीर), सूर्या (चेन्नई सिंघम्स), हृतिक रोशन



(बंगलोर स्ट्रायकर्स) आणि राम चरण (फाल्कन रायझर्स हैदराबाद) अशी नावे आहेत. अभिनेता सलमान खान यांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले की, क्रिकेट ही प्रत्येक भारतीय गल्लीची ओळख आहे. आणि जेव्हा हीच ऊर्जा स्टेडियमपर्यंत पोहोचते, तेव्हा आयएसपीएल सारख्या लीगचा जन्म होतो. मी कायमच क्रिकेटबद्दल अत्यंत उत्साही राहिलो आहे आणि आता आयएसपीएल सोबत जोडला गेल्याचा मला खूप आनंद आहे. ही लीग केवळ स्थानिक स्तरावरचा क्रिकेट पुढे नेत नाही, तर प्रतिभावान खेळाडूंना एक मजबूत आणि व्यापक मंच देखील उपलब्ध करून देते. ही तर फक्त सुरुवात आहे.

# २०२६ राष्ट्रकुल स्पर्धेत कुस्ती नसल्याबधल बबिताला खंत

**नवी दिल्ली, दि. ३० :**

माजी आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आणि राष्ट्रकुल पदकविजेती बबिता फोगटने २०२६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमधून कुस्तीला वगळण्यात आल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. भारतासारख्या कुस्तीप्रधान देशासाठी हा निर्णय धक्का देणारा असल्याचे बबिता फोगटने सांगितले .

बबिता म्हणाली , मी तीन वेळा राष्ट्रकुल पदक जिंकलं आहे आणि हे ऐकून खूप वाईट वाटलं की २०२६ मध्ये कुस्तीच नाही. आमच्यासाठी, विशेषतः महिला कुस्तीपटूंसाठी ही संधी अत्यंत महत्त्वाची होती. आम्ही २०१० पासून सातत्याने खेळत आलो आहोत आणि अनेक महिला कुस्तीपटूंनी याच व्यासपीठावरून आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःचं नाव कमावलं आहे. ही संधी नष्ट झाल्यासारखी वाटते.

ग्लासगोमध्ये २३ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ दरम्यान होणाऱ्या २०२६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या कार्यक्रमातून कुस्ती, हॉकी, बॅडमिंटन आणि क्रिकेटसारख्या भारतीयांसाठी महत्त्वाच्या खेळांना वगळण्यात आले आहे, त्यामुळे भारताच्या



पदक संधींवर मोठा परिणाम होणार आहे.

गेल्या काही दशकांत, विशेषतः कुस्तीमधून भारताने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये सातत्याने भरघोस पदके जिंकली आहेत. महिलांमध्येही साक्षी मलिक, विनेश फोगट, दिव्या काकरन यांच्यासारख्या कुस्तीपटूंनी जागतिक व्यासपीठावर आपली छाप सोडली आहे.

२०२६ च्या राष्ट्रकुल स्पर्धांसाठी सादर करण्यात आलेल्या खेळांच्या यादीत केवळ १० खेळांचा समावेश आहे. यामध्ये अॅथलेटिक्स, पोहणे, ३३ बास्केटबॉल, ट्रॅक सायकलिंग, वेटलिफ्टिंग, लॉन बाउल्स, जिम्नॅस्टिक्स, नेटबॉल, बॉक्सिंग आणि ज्युडो यांचा समावेश आहे.

ग्लासगो शहरातील चारच ठिकाणी खेळ होणार असल्यामुळे कार्यक्रम मर्यादित ठेवल्याचे आयोजकांचे स्पष्टीकरण आहे. मात्र, यामुळे अनेक देशांच्या खेळाडूंना संधीच मिळणार नाही, असे बबिता यांनी सांगितले. बबिता म्हणाली , महिला कुस्तीला यश मिळवायला किती संघर्ष करावा लागला हे आम्हाला माहीत आहे. अनेक खेळाडूंनी कठोर प्रशिक्षण, सामाजिक अडथळे पार करून पदके मिळवली. आता स्पर्धेतून कुस्तीच वगळली गेली, तर त्यांच्या पुढील पिढीच्या संधीच हिरावून घेतल्या जातील.

दरम्यान, फिट इंडिया संडेज ऑन सायकल' उपक्रमात सहभाग घेताना बबिता फोगट हिने आरोग्य व फिटनेसवर भर देण्याचे आवाहनही केले. सायकलिंग हा एक अत्यंत उपयुक्त आणि सहज उपलब्ध असलेला व्यायाम प्रकार आहे. युवकांनी दररोज थोडा वेळ स्वतःच्या आरोग्यासाठी द्यावा, असे ती म्हणाली .

# आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतक्त्यात ऑस्ट्रेलिया अव्वलस्थानी



**दुबई, दि. २ :**

आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५ - २७ च्या गुणतक्त्यात ऑस्ट्रेलिया पहिल्या आणि इंग्लंड दुसऱ्या स्थानी आहे. बांगलादेश तिसऱ्या आणि श्रीलंका चौथ्या स्थानी आहे. भारत पाचव्या आणि वेस्ट इंडिज सहाव्या स्थानावर आहे. न्यूझीलंड, पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका नव्या हंगामात अद्याप एकही कसोटी सामना खेळलेले नाहीत.

ऑस्ट्रेलिया वेस्ट इंडिज विरुद्धची पहिली कसोटी १५९ धावांनी जिंकली. इंग्लंड भारताविरुद्धची पहिली कसोटी पाच गडी राखून जिंकला. या विजयांमुळे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड प्रत्येकी एक कसोटी सामना खेळल्यानंतर आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५ - २७ च्या गुणतक्त्यात अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या स्थानावर आहेत. मोठ्या विजयामुळे ऑस्ट्रेलिया पहिल्या आणि मोठ्या पराभवामुळे वेस्ट इंडिज सहाव्या स्थानी आहे.

बांगलादेश आणि श्रीलंका यांच्यात दोन कसोटी सामने झाले. यातील एक अनिर्णित राहिला तर दुसरा कसोटी सामना श्रीलंकेने ७८ धावांनी जिंकला. पण अनिर्णित सामन्यात बांगलादेशने पहिल्या डावात सर्वबाद ४९५ धावा आणि दुसऱ्या डावात सहा बाद २८५ धावा केल्या. तर श्रीलंकेने पहिल्या डावात सर्वबाद ४८५ आणि दुसऱ्या डावात चार बाद ७२ धावा केल्या होत्या. नंतर दुसऱ्या कसोटीत श्रीलंकेने पहिल्या डावात सर्वबाद ४५८ धावा केल्या. बांगलादेशने पहिल्या डावात सर्वबाद २४७ आणि दुसऱ्या डावात सर्वबाद १३३ धावा केल्या होत्या. अनिर्णित कसोटीतील कामगिरीमुळे बांगलादेश गुणतक्त्यात तिसऱ्या स्थानी आणि श्रीलंका चौथ्या स्थानी आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक ३०१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 301 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .